


परळी

# संघर्षनेता

समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता.




https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे

बीड | वर्षे- 11 वे | अंक क्र 109 | गुरुवार दि. 14 मे 2026 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060


# सुनील तटकरे, प्रफुल पटेलांविषयी सर्वात मोठा गौप्यस्फोट...

## राष्ट्रवादीतील कोण कोण भाजपच्या वाटेवररोहित पवारांच्या दाव्याने एकच खळबळ



अजितदादांच्या राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेतली. त्यानंतर राज्यातील राजकारण ढवळून निघाले. या वेगवान घडामोडी घडत असतानाच आज आमदार रोहित पवार यांनी मोठा बॉम्ब टाकला. राष्ट्रीय कार्यकारणीतील नेते प्रफुल पटेल आणि तटकरे यांच्याविषयी त्यांनी मोठे वक्तव्य केले आहे. रोहित पवार यांच्या दाव्याने मोठी खळबळ उडाली आहे. राज्याच्या राजकारणात भूकंप येणार का? अशी चर्चा होत आहे.सुनील तटकरे, प्रफुल पटेल यांच्यासह राष्ट्रवादीचे 22 आमदार भाजपमध्ये जाणार आणि तिथून विधानसभेची निवडणूक लढवणार असा दावा आमदार रोहित पवार यांनी केला. त्यांच्या पक्षात काय सुरु आहे हे त्यांचा विषय आहे. पण त्या पक्षात अनेक नेते आहेत. कुणाचे नाव घेतले नाही आणि त्यामुळे कोणी दुखावत असेल. सकाळी धडासी निर्णय आणि नंतर ट्वीट करुन त्यात बदल करु असे म्हटल्या जात असेल तर हा त्या पक्षाचा विषय असल्याचे रोहित पवार यांनी अजित पवार राष्ट्रवादीतील घाडमोडींवर म्हटले आहे. त्याचवेळी तटकरे, पटेल आणि 22 आमदार हे भाजपच्या तिकीटावर निवडणूक लढवणार असल्याचा दावा त्यांनी केला.

सुनील तटकरे आणि प्रफुल पटेल हे अस्वस्थ आहेत चर्चा नाही. ते खरं आहे. पक्षांने त्यांना काढलं आहे. त्यांना डिमोट केलं आहेय सुनील शेळके यांना काय भविष्य कळत का ? तुम्ही भाजप सोडून या आम्ही स्वागत करू. दोन राष्ट्रवादी रोहित पवार यांना एकत्र नको आहे त्यावर त्यांनी अशी प्रतिक्रिया दिली. अजित दादांना न्याय मिळण्यासाठी पान 3 वर

# मोदींची थट्टा-मस्करी करु नका

## अनेक देशांत लॉकडाऊन लागलाय; फडणवीसांनी वाढवली धाकधुक



पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थितीमुळं क्रूड ऑईल, एलपीजी आणि खाद्य तेलांसह सोन्याच्या पुरवठा साखळीत अडथळा निर्माण झाल्यानं मोठा तुटवडा निर्माण होण्याची चिन्हं आहेत. तसंच यावर सध्या मोठ्या प्रमाणावर परेदशीच चलन खर्च होत असल्यानं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना या सर्व गोष्टी काटकसरीनं वापरण्याचं आवाहन केलं आहे.

त्यातच याच जागतिक परिस्थितीचा दाखला देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनेक देशांमध्ये लॉकडाऊन लागले असल्याचं सांगत एक प्रकारे भारतातही लॉकडाऊनचे संकेतच त्यांनी दिले आहेत. या विधानामुळं त्यांनी भारतीयांची धाकधुक वाढवली आहे.नाशिक आणि त्र्यंबकेश्वर इथं होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या बोधचिन्हाचं आज फडणवीसांच्या हस्ते अनावरण झालं, यावेळी 13 आखाड्यांच्या प्रमुख साधुंसोबत यावेळी बैठकही पार पडली. या कार्यक्रमाला हजेरी लावल्यानंतर पान 3 वर

# आज ठळक

## NEET पेपरफुटी प्रकरणात राहूरी लिंक; CBIच्या धाडसी कारवाईने राज्यात खळबळ




NEET 2026 पेपर फुटीप्रकरणात तपास यंत्रणा ॲक्शन मोडवर काम करत असताना, या प्रकरणाचे धागेदोरे देशभरात पसरल्याचे समोर येत आहे. या पेपर फुटीची महाराष्ट्रातील नाशिकपासून तपासाला सुरवात झाल्यानंतर, त्याची व्याप्ती हरियाणा, राजस्थान, उत्तराखंडपर्यंत पोहोचली आहे.

आता यात अहिल्यानगर जिल्ह्यातील तिघा संशयितांना ताब्यात घेतल्याचे समोर आले आहे. राहुरीतील धनंजय लोखंडे याच्यासह सीबीआयने तिघांना ताब्यात घेतल्याची सूत्रांची माहिती आहे. धनंजय लोखंडे याचे यात नाव समोर आले असले तरी इतर दोघांची नावे समजू शकलेली नाहीत.अहिल्यानगरमधील तिघांना ताब्यात घेत, सीबीआयने (CBI) तपासाला वेग घेतला आहे. ताब्यात घेतलेले तिघे अहिल्यानगरच्या (Ahilyanagar) ग्रामीण भागातील असल्याची माहिती समोर येत आहे. सीबीआय तपास करत असल्याने या तिघांचा रोल काय होता, याचा खुलासा अजून होऊ शकलेला नाही. परंतु संशयितांना ताब्यात घेतल्याचा माहितीला पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दुजोरा दिला. NEET पेपरफुटी प्रकरणाचे धागेदोरे अहिल्यानगर जिल्ह्यापर्यंत पोहचले आहेत. नाशिक (Nashik) इथल्या एका आरोपीला ताब्यात घेतल्यानंतर अहिल्यानगर जिल्ह्यातील आणखी एका संशयिताला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले. धनंजय निवृत्ती लोखंडे (वय 26) हा मूळचा राहुरी तालुक्यातील रहिवाशी असून तो सध्या पुण्यात वास्तव्यास होता.

## सोसाट्याचा वारा अन् गारांचा तडाखा, अर्ध्या महाराष्ट्राला अवकाळीने झोडपलं



राज्याच्या विविध भागात सूर्य आग ओकत असताना आज अनेक जिल्ह्यांना अवकाळी पावसाने झोडपून काढलं. नागपूर मध्ये दोन दिवसांच्या कडक उन्हानंतर आज दुपारच्या वेळी अवकाळी पावसाने हजेरी लावली होती. आज सकाळपासूनच कधी ऊन तर कधी ढगाळ वातावरण होते. मागील काही दिवस ढगाळ वातावरणानंतर दोन दिवसांपासून चांगलाच उन्हाचा तडाका पाहायला मिळाला होता. तापमान 44 अंशाचा घरात गेले असताना आज अचानक दुपारी वातावरणात बदल होऊन पावसाला सुरुवात झाली. त्यामुळे पुन्हा एकदा गारवा जाणवत आहे.

सांगलीच्या तासगाव तालुक्यातील वायफळे येथे गारांचा पाऊस झाला. दिवसभर उन्हाचा कडाका आणि सायंकाळच्या सुमारास ढगाळ वातावरण निर्माण झाले होते. अचानक वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने तासगाव तालुक्यामध्ये हजेरी लावली. वायफळे परिसरामध्ये गारांचा पान 3 वर

# परळीचे दिवंगत माजी नगराध्यक्ष जाबेर खाँ पठाण यांच्या कुटुंबीयांचे आ. धनंजय मुंडे यांनी केले सांत्वन

## परळी पंचायत समितीचे माजी उपसभापती माधवराव मुंडे यांचेही केले सांत्वन





परळी वैद्यनाथ (प्रतिनिधी) - परळीचे माजी नगराध्यक्ष म. जाबेर खाँ पठाण यांचे अल्पशा आजाराने नुकतेच दुःखद निधन झाले होते, आज माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी परळी शहरातील पठाण यांच्या निवासस्थानी भेट देऊन पठाण कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी पक्षात एकत्रित राहून शहराच्या विकासासाठी केलेल्या विविध कामांना व आठवणींना उजाळा देत धनंजय मुंडे यांनी जाबेर खाँ यांच्या स्मृतीस श्रद्धांजली वाहिली.

यावेळी बाजीराव भैय्या धर्माधिकारी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अय्युब भाई शेख, शकील कुरेशी यांसह आदी उपस्थित होते.

स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब, स्व. पंडित अण्णा मुंडे यांचे जुने सहकारी, परळी पंचायत समितीचे माजी उपसभापती तसेच टोकवाडी गावचे माजी सरपंच माधवराव मुंडे यांच्या पत्नी कै. द्वारकाबाई मुंडे यांचे नुकतेच दुःखद निधन झाले होते.

# समान काम, समान वेतन! उच्च न्यायालयाचा विषय शिक्षकांना मोठा दिलासा




राज्यातील जिल्हा परिषद शाळांमध्ये इयत्ता सहावी ते आठवीला शिकवणाऱ्या हजारो विषय शिक्षकांना अखेर मोठा दिलासा मिळाला आहे. अनेक वर्षांपासून पदवीधर वेतनश्रेणीपासून दूर ठेवणारा राज्य सरकारचा वादग्रस्त 'एक-तृतीयांश' नियम मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने थेट रद्दबातल ठरवला आहे. सरकारचा हा नियम भेदभावपूर्ण, तर्कहीन आणि संविधानविरोधी असल्याचे स्पष्ट शब्दांत न्यायालयाने सुनावले. राज्य शासनाने 13 ऑक्टोबर 2016 रोजी काढलेल्या परिपत्रकानुसार सहावी ते आठवीला शिकवणाऱ्या विषय शिक्षकांपैकी केवळ 33 टक्के शिक्षकांनाच सेवाज्येष्ठतेच्या पान 3 वर

# घरकुल लाभार्थ्यांचे हप्ते तातडीने द्या;

## ➲ खा.बजरंग सोनवणेंचे मुख्यमंत्र्यांना पत्रबीड जिल्ह्यात 54 हजार घरकुलांचे हप्ते रखडले



बीड जिल्ह्यामध्ये प्रधानमंत्री आवास योजनेसह इतर विविध घरकुल योजनांतर्गत घरकुलांचे काम हाती घेतलेल्या सुमारे 54 हजार लाभार्थ्यांचे हप्ते गेल्या अनेक महिन्यांपासून रखडल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. हप्ते न मिळाल्याने गरिबांच्या स्वप्नातील घरांची बांधकामे अर्धवट अवस्थेत असून, हक्काच्या निवाऱ्यासाठी लाभार्थ्यांना आता पावसाळ्याच्या तोंडावर उघड्यावर राहण्याची भीती सतावत आहे. या गंभी पान 3 वर

# धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त परळीत आज भव्य शोभायात्रेचे आयोजन-ॲड. प्रणव मराठे

## ● ना.पंकजाताई मुंडे, आ.धनंजयजी मुंडे, मा.खा.डॉ. प्रितमताई मुंडे यांच्यासह मान्यवरांच्या उपस्थितीत आज





परळी वैजनाथ / प्रतिनिधी

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त परळी शहरात आज गुरुवार दि. 14 मे रोजी भव्य सार्वजनिक जन्मोत्सव आणि दिमाखदार शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. नगरसेवक ॲड. प्रणव प्रकाश मराठे यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आलेली ही शोभायात्रा सायंकाळी 5 वाजता मराठे कॉम्प्लेक्स, उड्डाणपूल, परळी वैजनाथ येथून प्रारंभ होणार असून शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.



या भव्य सोहळ्याचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री मा. ना. पंकजाताई गोपीनाथ मुंडे, महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री मा. आ. धनंजय मुंडे आणि खासदार डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परळी नगर परिषदेच्या नगराध्यक्षा सौ. पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी पान 3 वर






# मराठा भवन विषयी बेमुद्दत ठिय्या आंदोलनाचा चौथा दिवस

## मागणी मान्य होईपर्यंत आंदोलन सुरुच राहणार - आंदोलनकर्त्यांचा निर्धार




परळी :

"मराठा भवन" व "बाल शिवबासह राजमाता जिजाऊ माँ साहेबांचा पुतळा" याविषयी सकल मराठा समाजाच्या वतीने परळी वै. नगर परिषद समोर सुरु असलेले बेमुद्दत ठिय्या आंदोलन चौथ्या दिवशीही सुरुच आहे.

सकल मराठा समाजाच्या वतीने सोमवार दिनांक 11 मे 2026 पासून नगर परिषद कार्यालया समोर बेमुद्दत ठिय्या आंदोलन सुरु करण्यात आले आहे.

परळी शहरात "मराठा भवन" उभारण्यासाठी पान 3 वर

# दुर्दैवी : परळीत जेवताना घास घशात अडकून पोलीस कर्मचाऱ्याचा मृत्यू



परळी वैजनाथ (प्रतिनिधी

प्रवासादरम्यान जेवण्यासाठी थांबले असताना, अन्नाचा घास घशात अडकून एका पोलीस धनंजय गुजर 48 तालुका पारवे जिल्हा वर्धा कर्मचाऱ्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना परळी-अंबाजोगाई रस्त्यावर घडली आहे. संबंधित कर्मचारी हे जिल्ह्याबाहेर कार्यरत होते.

मिळालेल्या माहितीनुसार, सदर पोलीस कर्मचारी परळी-अंबाजोगाई रस्त्यावरील एका धाब्यावर जेवणासाठी थांबले होते. जेवत असताना अचानक अन्नाचा घास घशात अडकल्याने त्यांना तीव्र ठसका लागला व उलट्या सुरु झाल्या. यातच त्यांची प्राणज्योत मालवली.

पुढील कार्यवाही:

मृतदेह शवविच्छेदनासाठी परळी येथील उपजिल्हा रुग्णालयात पान 3 वर

# तेलदराचा जागतिक सापळा

जागतिक बाजारातील अस्थिरता, सरकारी कररचना आणि राजकीय गणित यांच्या कचाट्यात पेट्रोल-डिझेलचे दर अडकले आहेत. या दरवाढीचा फटका केवळ वाहनधारकांनाच नाही, तर संपूर्ण अर्थव्यवस्था आणि सामान्य नागरिकांच्या जगण्यालाही बसत आहे.पहाट होत असते. शहर हळूहळू जागे होत असते. रस्त्यावरच्या पहिल्या गाड्या पेट्रोल पंपावर थांबतात. एक मध्यमवर्गीय माणूस महिन्याचा खर्च मनात मोजत गाडीमध्ये पेट्रोल भरत असतो. मीटरवरची रक्कम वाढत जाते आणि मनात प्रश्न उभा राहतो, हा दर नेमका ठरतो तरी कसा? आज हा प्रश्न केवळ एका वाहनधारकाचा राहिलेला नाही. तो भारताच्या अर्थव्यवस्थेच्या विश्वासार्हतेचा प्रश्न बनला आहे. पेट्रोल-डिझेलचे दर हे फक्त वाहन चालवण्यापुरते मर्यादित नाहीत. ते महागाई, उद्योगांचा खर्च, सरकारचा महसूल आणि सामान्य नागरिकाच्या दैनंदिन जीवनावर थेट परिणाम करतात.

सध्याच्या जागतिक परिस्थितीत हा प्रश्न अधिक तीव होतो. पश्चिम आशियातील तणाव, इराणभोवतीची अनिश्चितता, होर्मुझ सामुद्रधुनीतील अडथळ्यांची शक्यता या सगळ्यांमुळे कच्च्या तेलाच्या किमती अस्थिर झाल्या आहेत. काही महिन्यांपूर्वी तेल स्वस्त झाले होते; पण त्याचा ठोस फायदा ग्राहकाला दिसला नाही. आता किमती पुन्हा वाढू लागल्या आहेत आणि दरवाढीची भीती वाढत आहे. भारतासाठी ही परिस्थिती अधिक गुंतागुंतीची आहे. कारण, देश जवळपास 85 ते 90 टक्के कच्चे तेल आयात करतो. म्हणजेच, जगात कुठेही तणाव निर्माण झाला की, त्याचा थेट परिणाम भारतीय ग्राहकांच्या खिशावर होतो.केंद्र सरकार सांगते की, पेट्रोलचे दर 2010 पासून आणि डिझेलचे दर 2014 पासून नियंत्रणमुक्त आहेत. 2017 पासून दररोज दर बदलणारी पद्धत लागू झाली. याचा अर्थ असा की, दर पूर्णपणे बाजारावर आधारित असावेत. प्रत्यक्षात चित्र वेगळे दिसते. जागतिक बाजारात तेल स्वस्त झाले, तरी दर तत्काळ कमी होत नाहीत. काही काळ ते स्थिर ठेवले जातात आणि नंतर अचानक बदल होतात. त्यामुळे 'नियंत्रणमुक्ती' असूनही ही व्यवस्थापित प्रणाली असल्याची भावना निर्माण होते.सामान्य माणसाला सर्वात मोठा गोंधळ किमतीच्या रचनेबद्दल असतो. एका लिटर पेट्रोलमध्ये कच्च्या तेलाची किंमत, रिफायनिंग खर्च, केंद्र सरकारची एक्साईज ड्युटी, राज्य सरकारचा व्हॅट आणि डीलर कमिशन हे प्रमुख घटक असतात. साधारणपणे पाहिले तर मूळ कच्च्या तेलाचा हिस्सा 30 ते 40 टक्के असतो, तर उर्वरित मोठा हिस्सा करांचा असतो. केंद्राचा कर निश्चित असतो, तर राज्याचा कर टक्केवारीत असल्याने किंमत वाढली की, तोही वाढतो. याचा अर्थ असा की, ग्राहकाने भरलेल्या पैशांपैकी लक्षणीय हिस्सा सरकारकडे जातो. त्यामुळे एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो. कच्चे तेल स्वस्त झाले, तर त्याचा फायदा ग्राहकाला का मिळत नाही?

याचे उत्तर सरकारच्या महसुलात दडलेले आहे. इंधनावरील करांमधून मोठे उत्पन्न मिळते. किंमती घसरल्या की, कर कमी करण्याऐवजी ते स्थिर ठेवले जातात, जेणेकरून महसूल टिकून राहील. त्यामुळे ग्राहकाला मिळणारा फायदा मर्यादित राहतो आणि जेव्हा किमती वाढतात तेव्हा कर कमी करणे वित्तीयदृष्ट्या कठीण ठरते. अशावेळी दरवाढीचा भार थेट ग्राहकावर पडतो. इथेच ऑईल कंपन्या आणि सरकार यांच्यातील सीमारेषा धूसर होते. कागदावर कंपन्या स्वतंत्र आहेत; पण प्रत्यक्षात दर स्थिर ठेवले जातात. वाढ टाळली जाते आणि नंतर एकत्रित बदल होतात. त्यामुळे 'बाजार' आणि 'राजकारण' यांच्यातील फरक सामान्य माणसासाठी अस्पष्ट होतो.इंधन दर आणि निवडणुका यांच्यातील नाते अधिकृतपणे मान्य केले जात नसले, तरी लोकांच्या अनुभवातून एक पॅटर्न दिसून येतो. अनेकदा निवडणुकांपूर्वी दर स्थिर राहतात आणि नंतर बदल होतात, अशी धारणा तयार झाली आहे. सध्याच्या जागतिक परिस्थितीत किमती वाढत असताना हा दबाव आणखी वाढतो. त्यामुळे निवडणुकांनंतर दरवाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जाते. ही धारणा खरी असो वा नसो, ती व्यापकपणे मान्य केली जाते आणि त्यामुळे दरनिर्धारण प्रक्रियेवरील विश्वास कमी होतो. दरम्यान, जागतिक तणावामुळे भारतासमोर एक मोठं आव्हान उभे ठाकले आहे. कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या की, आयात बिल वाढते, रुपयावर दबाव येतो, महागाई वाढते आणि व्याजदरांवरही परिणाम होतो. त्यामुळे इंधन दराचा प्रश्न केवळ आर्थिक राहत नाही. तो राष्ट्रीय स्थैर्याचा मुद्दा बनतो.

या पार्श्वभूमीवर एक गोष्ट स्पष्ट होते. भारतामध्ये दर ठरवण्याची प्रक्रिया पारदर्शक नाही. ग्राहकाला अंतिम किमत दिसते; पण त्यामागचे गणित दिसत नाही. त्यामुळे 'फ्युएल प्राईस ट्रान्सपरन्सी फेमवर्क'सारख्या स्पष्ट, नियमाधारित प्रणालीची गरज व्यक्त केली जाते. यात कच्च्या तेलाची किंमत, विनिमय दर, कर आणि कंपन्यांचा नफा हे सर्व घटक उघडपणे मांडले जातील. यामुळे दरवाढ किंवा दरकपात का झाली, हे नागरिकांना समजू शकेल.

याचबरोबर पेट्रोल-डिझेलला जीएसटीमध्ये आणण्याची चर्चा वारंवार पुढे येते. यामुळे देशभर एकसमान दर लागू होऊ शकतो आणि कररचना सुलभ होईल, असा युक्तिवाद आहे. उद्योगांना इनपुट टॅक्स क्रेडिट मिळाल्यास वाहतूक खर्च कमी होऊ शकतो; मात्र याला विरोधही आहे. कारण, इंधनावरील कर हा केंद्र आणि राज्य दोघांसाठी मोठा महसूल स्त्रोत आहे. त्यामुळे हा प्रश्न केवळ ग्राहकांच्या फायद्याचा नसून आर्थिक संतुलनाचा आहे.सरकार आणखी एक पर्यायही विचारात घेत आहे. इंधनासाठी किंमत स्थिरीकरण निधी. यामध्ये अतिरिक्त साठा तयार करून संकटकाळात तो बाजारात सोडण्याची योजना आहे, जेणेकरून दरवाढीचा धक्का कमी करता येईल. हा उपाय सबसिडी नसून आपत्कालीन हस्तक्षेप म्हणून पाहिला जातो; मात्र यासाठी साठवणूक, निधी आणि बाजारातील संतुलन राखणे ही मोठी आव्हाने आहेत. जागतिक स्तरावर अनेक देशांनी वेगवेगळे मार्ग अवलंबले आहेत. काही पूर्ण बाजारावर आधारित, काही स्पष्ट कररचनेवर, तर काही पारदर्शक सरकारी हस्तक्षेपावर. भारत मात्र अजूनही या दोन टोकांमध्ये अडकलेला दिसतो.

इंधन दराचा परिणाम फक्त वाहनांपुरता मर्यादित नाही. तो अन्नधान्य, भाजीपाला, औषधे आणि बांधकाम साहित्य सगळ्यांच्या किमतीवर परिणाम करतो. डिझेल महागले की, वाहतूक खर्च वाढतो आणि त्याचा परिणाम प्रत्येक घराच्या बजेटवर होतो. त्यामुळे इंधन दरातील अनिश्चितता ही संपूर्ण अर्थव्यवस्थेला अस्थिर करते. दीर्घकालीन उपाय म्हणून भारताने इलेक्ट्रिक वाहने, इथेनॉल मिश्रण, हरित ऊर्जा आणि सार्वजनिक वाहतूक यावर भर देणे आवश्यक आहे. तोपर्यंत पारदर्शक आणि नियमाधारित दरव्यवस्था हीच सर्वात मोठी गरज आहे.







# स्वाभिमानाची प्रेरणा देणारे महाप्रतापी धर्मवीर संभाजी महाराज

छत्रपती संभाजी महाराजांचा जन्म 14 मे इ.स.1657 रोजी पुरंदर येथे झाला आणि हिंदवी स्वराज्यात तेजस्वी तारा प्रगट झाला. राजपुत्र असल्यामुळे रणांगणातील मोहीम व राजकारणातील डावपेच यांचा संपूर्ण अभ्यास अवगत होता. त्याचप्रमाणे लहानपणापासूनच ते अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचे मोठे धनी होते. संभाजींना लहानपणापासूनच अनेक कठीणायीचा सामना करावा लागला.संभाजी महाराज लहान असतांनाच त्यांच्या आई महाराणी सईबाई यांचे निधन झाले आणि त्यांच्या काळजावर मोठा आघात झाला. या आघातापासुन सावरण्यास राजमाता जिजाबाई यांनी आपले सर्वस्व पणाला लावले आणि हिंदवी स्वराज्याच्या निर्मितीसाठी व रक्षणासाठी शूरवीर संभाजी नावाचा महामेरू उभा केला. संभाजींची सावत्र आई पुतळाबाई यांनी आपल्या मुलासारखी वागणुक देवुन वटवृक्षाचे काम केले.परंतु त्यांची दुसरी सावत्र आई सोयराबाई यांनी संभाजीराजांच्या रस्त्यात बाभळीचे काटे रोवुन पोरकेपणाची वागणुक दिली व महाराजांच्या राजकीय कारकीर्दीत ढवळाढवळ करण्याचा प्रयत्न केला. संभाजीच्या मनात लहानपणापासूनच आपण स्वराज्यासाठी काहीतरी केले पाहिजे.या उद्देशाने त्यांनी राजकारणातील संपूर्ण बारकावे आत्मसात केले. मुगलांच्या घडामोडी आणि राजकारण त्यांना लहान वयातच कळले.त्याचप्रमाणे संस्कृतसह इतर आठ भाषांचे ज्ञान त्यांना अवगत होते.याचा फायदा भविष्यात व्हावा या विचाराने शिवाजी महाराजांनी त्यांना आग्रा भेटीच्या वेळी बरोबर नेले.त्यावेळी संभाजीराजे फक्त 9 वर्षाचे होते.शिवाजी महाराज औरंगजेबाच्या नजरकैदेतुन निसटल्यानंतर त्यांना संभाजींची चिंता वाटू लागली.औरंगजेब आगबबुला झाला अशा वेळी संभाजीराजे स्वराज्यात सुखरुप पोहचावे या उद्देशाने शिवाजी महाराजांनी संभाजीराजांचे निधन झाल्याची अफवा सर्वत्र पसरवून मोगलांच्या डोळ्यात धुळ झोकून संभाजींना महाराष्ट्रात सुखरूप पोहचण्याचा मार्ग मोकळा केला.इ.स.1674 मध्ये शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला.शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाल्यानंतर अवघ्या 12 दिवसातच राजमाता जिजाऊंचे निधन झाले आणि पुन्हा संभाजींना मोठा जब्बर धक्का बसला.त्यानंतर त्यांच्याकडे मायेने लक्ष देणारे कोणी राहिले नाही.कारण शिवाजी महाराज स्वराज्याच्या राजकारणात आणि रणांगणावर गुंतले होते.छत्रपती संभाजीं महाराजांनी आपल्या वडिलांप्रमाणेच सक्तीने धर्मांतरन करणाऱ्या इंग्रज, पोर्तुगीज व मोगल सत्ताधाऱ्यांचा कडाडून विरोध केला.औरंगजेबाने इ.स.1682 साली मराठ्यांवर हल्ला केला.औरंगजेब सैन्य, दारुगोळा, हत्ती-घोडे याबाबतीत बलशाली होता.कारण औरंगजेबाचे सैन्य संभाजीं महाराजांच्या तुलनेत



5 पटीने अधिक होते.त्याकाळी जगातील सर्वात शक्तिशाली सैन्यामध्ये औरंगजेबाचा समावेश होता. तरीही संभाजीं महाराजांच्या नेतृत्वाखाली मराठयांनी हिमतीने लढा दिला.त्याचप्रमाणे संभाजीं महाराजांनी गोव्याचे पोर्तुगीज, जंजिऱ्याच्या सिद्धी आणि म्हैसूरचा चिक्कदेवराय या शत्रूंना जोरदार धडा शिकवला. त्यामुळे संभाजीं महाराजांच्या विरुद्ध औरंगजेबाला मदत करायची हिंमत कोणाचीही झाली नाही. कारण त्याकाळी संभाजीं म्हणजे एक वादळी तुफान होते. त्यामुळेच संभाजीं महाराजांच्या नेतृत्वाखालील मराठ्यांनी मोठ्या शिताफीने झुंज दिली.इ.स.1689 च्या सुरुवातीला संभाजीं महाराजांनी त्यांच्या महत्वाच्या सरदारांना बैठकीसाठी कोकणातील संगमेश्वर येथे बोलावले.परंतु आपल्याच लोकांनी विश्वासघात केला व संभाजी महाराजांच्या स्थानाची माहिती मोगलांना दिली.यात गणोजी शिर्के हे महाराजांचे मेहुणे होते व कान्होजी शिर्के हे दोघेही छत्रपती संभाजी महाराजांचे जवळचे नातेवाईक होते. परंतु वतनाच्या मुद्द्यावरुन त्यांनी छत्रपती संभाजी महाराजांचा विश्वासघात केला व पाठीत खंजीर खुपसला.यालाच म्हणतात "घर का भेदी लंका ढाये"1 फेब्रुवारी इ.स.1689 रोजी संभाजीं महाराज रायगडाकडे रवाना होत असतानाच औरंगजेबाचा सरदार मुकर्रबखान याने नागोजी माने यांच्या साथीने संगमेश्वरावर हल्ला केला. मराठ्यात आणि शत्रूच्या सैन्यात मोठी चकमक झाली. मराठ्यांचे संख्याबळ कमी असल्याने शत्रूचा हल्ला परतवून लावू शकले नाही.त्यामुळे शत्रूने संभाजीं महाराजांना व त्यांच्या सोबत असलेल्या कवि कलश यांना जिवंत पकडले. अशाही परीस्थितीत महाराजांना वाचविण्याचा प्रयत्न मराठ्यांनी केला.परंतु ते त्यात यशस्वी झाले नाहीत.पहिला प्रयत्न जोत्याजी केसरकर यांनी केला. यानंतर अप्पा शास्त्री यांनी देखील केला.परंतु दोन्ही प्रयत्न अयशस्वी ठरले व संभाजीं महाराज औरंगजेबाच्या तावडीत सापडले. औरंगजेबाच्या तावडीत सापडल्या नंतर औरंगजेबाने महाराजांना इस्लाम धर्म स्वीकारण्याची जबरदस्ती केली.परंतु त्यांनी आपल्या धर्माचे पालन करत इस्लाम धर्म स्वीकारण्यास नकार दिला. त्याचप्रमाणे राज्याचा संपूर्ण खजाना आमच्या स्वाधीन करावा अशी अट घातली तेही संभाजीं महाराजांनी मान्य केली नाही. संभाजी राजांचा धीटपणा आणि स्वराज्याच्या प्रती प्रेम पाहून औरंगजेब तिलमिला झाला आणि तेव्हा पासून संभाजीं महाराजांना यातना देण्यास सुरुवात केली.तरीही औरंगजेबाची कोणतीही अट माणन्यास व त्यांच्या सामोरं यत्किंचितही झुकण्यास महाराज तयार नव्हते. संभाजी महाराजांनी औरंगजेबाला खडसावून सांगितले की स्वराज्याच्या रक्षणासाठी व प्रजेच्या हितासाठी कोणतीही तडजोड करणार नाही. यासाठी माझे प्राण गेले तरी चालेल. अशी सिंह गर्जना ऐकताच औरंगजेबाने संभाजीं महाराजांना कठोर यातना देण्यास सुरुवात केली.औरंगजेबाने महाराजांचे डोळे काढले, महाराजांची जीभ कापली, महाराजांवर अतोनात वार करण्यात आले.हे सगळं संभाजीं महाराज तब्बल 40 दिवस सहन करीत होते. तरीही मराठा साम्राज्यासाठी लढत रहाले. एवढ्या छळाने सुध्दा औरंगजेबाचा आत्मा शांत झाला नाही. शेवटी औरंगजेबाने आपली संपूर्ण क्रूरतेची हद पार केली व 11 मार्च 1689 रोजी महाराजांचे हात-पाय, आणि त्यांचे सर्व देह शरीरापासून वेगळे करुन त्यांची क्रूरतेने हत्या करण्यात आली.शेवटी औरंगजेब हताश होऊन म्हणतो की 'माझ्या पोटी असा शूरवीर, धाडसी पुत्र जन्माला का आला नाही?"याची खंत त्याला मरेपर्यंत सतावत होती.शत्रूला हेवा वाटेल असे महान कार्य संभाजीं महाराजांनी केले व जगाच्या इतिहासात कमी वयात म्हणजे 32 व्या वर्षी स्वराज्याच्या व प्रजेच्या रक्षणासाठी बलिदान देणारा राजा म्हणून संभाजीं महाराजांसमोर आज सर्वच नतमस्तक होतात. संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम. महाराष्ट्र हा शूर वीरांचा व धर्मवीरांचा आहे.याची जान आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे.त्यामुळे धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून राज्यातील भ्रष्टाचार, महागाई, शेतकऱ्यांच्या समस्या, बेरोजगारी,आरोग्य,शिक्षण, मुलींवरील व महिलांवरील अत्याचार इत्यादी समस्याकडे जातीने लक्ष देण्याची गरज आहे.यामुळे जनतेला (प्रजेला) सुख-समाधान प्राप्त होईल. कारण आज आपण जो मोकळा श्वास घेतो व हसतो-बागडतो आहोत तो छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुंण्यायीमुळेच. हीबाब आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी लक्षात ठेवली पाहिजे. महाराष्ट्र ही संतांची, शुर वीरांची, थोर महात्म्यांची व क्रांतीकारकांची पावणभुमि आहे.याची जोपासना आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी करने अत्यंत गरजेचे आहे.धर्मवीरांनी महाराष्ट्र घडवीण्यासाठी बलीदान दिले.परंतु आजचा राजकीय पुढारी गरीब, सर्वसामान्य, शेतकरी यांचे रक्त भ्रष्टाचाराच्या माध्यमातून पित आहे व शोषण करीत आहे.याची खंत धर्मवीर संभाजी महाराज, साधुसंत, थोर पुरुष, क्रांतीकारक व आपले पुर्वज यांना अवश्य होत असेल.त्यामुळे कोणत्याही महापुरुषांचे बलीदान व्यर्थ जाणार नाही याची काळजी आजच्या राजकीय पुढाऱ्यांनी घेतली पाहिजे व संभाजीं महाराजांचे आदर्श सामोरं ठेऊन पुढील वाटचाल व्हायला हवी. यातच आपल्याला धर्मवीर संभाजी महाराज दिसून येईल.आज बदलत्या हवामानामुळे प्रदूषणाच्या विळख्यात संपूर्ण पृथ्वी आहे.तीला वाचविण्यासाठी धर्मवीर संभाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून युध्दपातळीवर मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण व्हायला हवे.कारण आज लावलेले वृक्ष शेकडो काळ टिकेल. याच वृक्षांच्या पाणात, फुलात, फळात व जळामुळात संपूर्ण थोर महात्म्याचे व शुरविरांचे दर्शन अवश्य होईल.त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील संपूर्ण गडकिल्ले सुसज्जित करुन पर्यटनासाठी मोकळी करावीत. कारण गडकिल्ले महाराष्ट्राची आण -बाण -शान आहे. त्यामुळे त्यांची जपणूक केलीच पाहिजे. यामुळे नवीन पिढीला संपूर्ण गडकिल्ल्यांचा इतिहास समजण्यास सुलभ जाईल आणि शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांचा इतिहास सहज समजूत येईल.कारण याच गडकिल्ल्यात महाराष्ट्राची खरी संस्कृती दडलेली आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त कोटी कोटी प्रणाम व मानाचा मुजरा. हर हर महादेव!


**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार.**
**( स्वतंत्र पत्रकार)**



**मो.नं.9921690779, नागपूर.**


# ऊर्जा संकट : भविष्यातील सर्वात मोठे आर्थिक युद्ध

**डॉ. भारत कऱ्हाड**



जागतिक अर्थव्यवस्था सध्या एका अत्यंत गंभीर आणि धोकादायक टप्प्यातून जात आहे. रशिया-युक्रेन युद्धामुळे जगभरातील ऊर्जा बाजारामध्ये प्रचंड अस्थिरता निर्माण झाली आहे. पश्चिम आशियातील संघर्ष, तेल वाहतूक मार्गांवरील वाढते धोके, अमेरिकन डॉलरचे वाढते वर्चस्व आणि जागतिक महागाई यामुळे अनेक देश आर्थिक संकटाचा सामना करत आहेत. काही दशकांपूर्वी युद्धे सीमांसाठी लढली जात होती; पण आता जग "ऊर्जा युद्धा"च्या नव्या युगात प्रवेश करत आहे. तेल, गॅस, कोळसा, वीज आणि दुर्मिळ खनिजे यांच्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी जागतिक महासत्तांमध्ये अप्रत्यक्ष संघर्ष सुरु झाला आहे. भारतासारख्या विकसनशील देशांसाठी ही परिस्थिती अधिक गंभीर आहे, कारण भारत मोठ्या प्रमाणावर ऊर्जा आयातीवर अवलंबून आहे. याच पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऊर्जा बचत, इलेक्ट्रिक वाहने, स्थानिक उत्पादन आणि आत्मनिर्भरतेवर भर दिला आहे. कारण भविष्यातील सर्वात मोठे आर्थिक आणि राजकीय युद्ध "ऊर्जेसाठी" होण्याची शक्यता अनेक तज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

"ऊर्जा संकट" म्हणजे केवळ पेट्रोल-डिझेल महाग होणे नाही. एखाद्या देशाला उद्योग, शेती, वाहतूक, वीज उत्पादन आणि दैनंदिन जीवनासाठी पुरेशी ऊर्जा उपलब्ध न राहणे किंवा ती अत्यंत महाग होणे म्हणजे ऊर्जा संकट. आधुनिक जगातील प्रत्येक गोष्ट ऊर्जेवर चालते. वाहनं, कारखाने, मोबाईल नेटवर्क, इंटरनेट, विमानं, रेल्वे, रुग्णालयं, शेती आणि घरगुती उपकरणे — या सर्वांचा पाया ऊर्जेवर उभा आहे.

भारत हा जगातील तिसऱ्या क्रमांकाचा ऊर्जा वापरणारा देश आहे. भारत आपल्या एकूण कच्च्या तेलाच्या गरजेपैकी सुमारे 85 टक्के तेल आयात करतो. नैसर्गिक वायू आणि काही प्रकारच्या कोळशासाठीही भारताला आयातीवर अवलंबून राहावे लागते. काही वर्षांमध्ये भारताचे तेल आयात बिल 150 अब्ज डॉलरच्या पुढे गेले आहे. ही रक्कम भारतीय रुपयामध्ये लाखो कोटींच्या घरात जाते. त्यामुळे ऊर्जा दर वाढले की त्याचा थेट परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर होतो.

आजची परिस्थिती एवढी गंभीर का झाली, यामागे अनेक कारणे आहेत. सर्वात मोठे कारण म्हणजे रशिया-युक्रेन युद्ध. रशिया हा जगातील सर्वात मोठ्या तेल आणि गॅस निर्यातदार देशांपैकी एक आहे. युद्धानंतर युरोपियन देशांनी रशियावरील निर्बंध वाढवले. त्यामुळे जागतिक ऊर्जा पुरवठा साखळी विस्कळीत झाली. तेल आणि गॅसचे दर झपाट्याने वाढले.

दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे पश्चिम आशियातील अस्थिरता. सौदी अरेबिया, इराण, इराक, संयुक्त अरब अमिराती आणि कतार हे जगातील प्रमुख ऊर्जा उत्पादक देश आहेत. या भागात संघर्ष वाढला की तेल बाजार ताबडतोब अस्थिर होतो. काही वेळा तेल वाहतूक मार्गांवरील तणावामुळेही जागतिक किंमती वाढतात.

तिसरे कारण म्हणजे वाढती जागतिक ऊर्जा मागणी. चीन, भारत आणि इतर विकसनशील देशांमध्ये औद्योगिकीकरण आणि शहरीकरण झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे ऊर्जा वापरही वेगाने वाढतो आहे. जगातील ऊर्जा संसाधने मर्यादित आहेत; पण मागणी सतत वाढत आहे.

ऊर्जा संकटाचा सर्वात मोठा परिणाम सामान्य नागरिकांवर होतो. पेट्रोल-डिझेल महाग झाले की वाहतूक खर्च वाढतो. वाहतूक खर्च वाढला की अन्नधान्य, भाज्या, दूध, बांधकाम साहित्य आणि दैनंदिन वस्तू महाग होतात. म्हणजे ऊर्जा संकट थेट महागाईमध्ये रूपांतरित होते.

उदाहरणार्थ, जर पेट्रोल-डिझेल दर 10 ते 15 रुपयांनी वाढले, तर ट्रक वाहतूक खर्च वाढतो. त्याचा परिणाम बाजारातील प्रत्येक वस्तूवर होतो. शेतातून शहरात माल आणणे महाग होते. उद्योगांचे उत्पादन खर्च वाढतात. विमान प्रवास महाग होतो. वीज निर्मिती खर्च वाढतो.

ऊर्जा संकटाचा उद्योगांवरही गंभीर परिणाम होतो. भारतातील अनेक उद्योग ऊर्जा-आधारित आहेत. स्टील, सिमेंट, रसायने, खतं आणि उत्पादन उद्योगांना मोठ्या प्रमाणावर ऊर्जा लागते. ऊर्जा महाग झाली की उत्पादन खर्च वाढतो. काही उद्योगांना नफा टिकवणे कठीण जाते. लघुउद्योगांना याचा विशेष फटका बसतो.

शेती क्षेत्रावरही याचा मोठा परिणाम होतो. डिझेल पंप, ट्रॅक्टर, खतं आणि वाहतूक खर्च वाढल्यामुळे शेतकऱ्यांचा खर्च वाढतो. परिणामी अन्नधान्य महाग होते. ग्रामीण अर्थव्यवस्थेवर ताण वाढतो.

ऊर्जा संकटाचा राष्ट्रीय सुरक्षेशीही थेट संबंध आहे. एखादा देश जर ऊर्जा आयातीवर खूप अवलंबून असेल, तर जागतिक संघर्षाच्या काळात त्याची अर्थव्यवस्था असुरक्षित बनते. ऊर्जा पुरवठा थांबला किंवा महाग झाला, तर उद्योग आणि वाहतूक व्यवस्था विस्कळीत होऊ शकते.

मात्र ऊर्जा संकट केवळ भारतापुरते मर्यादित नाही. युरोपमधील अनेक देशांनी रशियन गॅसवरील अवलंबित्वामुळे मोठा आर्थिक ताण अनुभवला. काही देशांमध्ये वीज दर प्रचंड वाढले. उद्योग बंद करण्याची वेळ आली. म्हणजे ऊर्जा ही आता केवळ आर्थिक गोष्ट राहिलेली नाही; ती भू-राजकारणाचा केंद्रबिंदू बनली आहे.

या परिस्थितीसाठी केवळ सरकार जबाबदार नाही. जागतिक राजकारण, वाढती उपभोगवादी जीवनशैली, वाहन संस्कृती, अनियोजित शहरीकरण आणि ऊर्जा अपव्यय यांचाही मोठा वाटा आहे. भारतामध्ये ऊर्जा बचतीबाबत अजूनही पुरेशी जागरुकता नाही. अनेक वेळा वीज, पेट्रोल आणि संसाधनांचा मोठ्या प्रमाणावर अपव्यय होतो.

भारतासमोर आता तीन स्तरांवरील संकट उभे आहे. जागतिक स्तरावर ऊर्जा युद्ध आणि पुरवठा संकट आहे. राष्ट्रीय स्तरावर आयात अवलंबित्व आणि वाढते ऊर्जा बिल आहे. स्थानिक स्तरावर महागाई, उद्योग खर्च आणि सामान्य नागरिकांचा आर्थिक ताण वाढत आहे.

यावर उपाय काय असू शकतात? सर्वप्रथम भारताने ऊर्जा स्वावलंबनाकडे गंभीरपणे वाटचाल करणे आवश्यक आहे. सौरऊर्जा, पवनऊर्जा, जैवइंधन आणि जलविद्युत यांसारख्या नवीकरणीय ऊर्जेला प्राधान्य द्यावे लागेल. भारताने सौरऊर्जा क्षेत्रात काही प्रमाणात प्रगती केली आहे; पण अजून मोठी क्षमता वापरायची बाकी आहे.

दुसरे महत्त्वाचे म्हणजे इलेक्ट्रिक वाहनांना प्रोत्साहन देणे. पेट्रोल-डिझेलवरील अवलंबित्व कमी झाले, तर तेल आयात बिल कमी होऊ शकते. सार्वजनिक वाहतूक मजबूत करणे अत्यंत आवश्यक आहे. मेट्रो, इलेक्ट्रिक बस आणि रेल्वे व्यवस्था अधिक प्रभावी करावी लागेल.

ऊर्जा बचत हीही अत्यंत महत्त्वाची आहे. एलईडी बल्ब, ऊर्जा कार्यक्षम उपकरणं, स्मार्ट इमारती आणि ऊर्जा व्यवस्थापन प्रणाली यामुळे मोठी बचत होऊ शकते. उद्योगांनी ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञान वापरणे आवश्यक आहे.

भारताने ऊर्जा स्त्रोतांचे विविधीकरणही करावे लागेल. एका देशावर किंवा एका ऊर्जा स्त्रोतावर जास्त अवलंबून राहणे धोकादायक असते. तेल आयातीसाठी विविध देशांसोबत संबंध मजबूत करावे लागतील.

सामान्य नागरिकांनीही ऊर्जा बचतीची सवय अंगीकारणे आवश्यक आहे. अनावश्यक वाहन वापर कमी करणे, सार्वजनिक वाहतूक वापरणे, वीज बचत करणे आणि स्थानिक उत्पादनांना प्राधान्य देणे आवश्यक आहे. कारण 140 कोटी लोकसंख्या असलेल्या देशात छोट्या सवयींचाही राष्ट्रीय अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होतो.

जर भारताने ऊर्जा संकटाकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही, तर भविष्यात महागाई, व्यापार तूट आणि आर्थिक ताण अधिक वाढू शकतो. उद्योग खर्च वाढतील. सामान्य नागरिकांचे जीवन अधिक महाग होईल. परकीय चलन साठ्यावर प्रचंड दबाव येऊ शकतो.

आज जग ऊर्जा युद्धाच्या नव्या टप्प्यात प्रवेश करत आहे. भविष्यात ज्यांच्याकडे ऊर्जा सुरक्षा, ऊर्जा स्वावलंबन आणि ऊर्जा कार्यक्षमता असेल, ते देश आर्थिकदृष्ट्या अधिक मजबूत राहतील. अशा परिस्थितीत भारताने जर योग्य वेळी ऊर्जा क्षेत्रामध्ये मोठे परिवर्तन केले, तर तो भविष्यातील संकटांना अधिक सक्षमपणे सामोरे जाऊ शकतो आणि आर्थिक महासत्ता बनण्याच्या दिशेने अधिक वेगाने वाटचाल करु शकतो.


**लेखक : डॉ. भारत कऱ्हाड,**
**प्राचार्य, वराडकर महाविद्यालय, दापोली जिल्हा रत्नागिरी.**


**हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी अ‍ॅक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com**

## पान 1 वरुन

आवाज उठवा आधी. उगीच डोळ्यात पाणी आणून काय होणार नाही, असा टोला त्यांनी शेळके यांना लगावला.आमचा पक्ष भाजपसोबत विलीन होणार नाही असे रोहित पवार म्हणाले. त्यामुळे त्यांनी पुन्हा दोन्ही राष्ट्रवादी विलिनीकरणाच्या मुद्दावर भाष्य केले. सुनील तटकरे हे काल शरद पवार यांना भेटले. त्यांनी ही सदिच्छा भेट असल्याचे म्हटले आहे. त्यांनी या भेटीदरम्यान कोणतीही राजकीय चर्चा झाली नसल्याचे म्हटले आहे. तीन वर्षानंतर तटकरे हे पवारांना भेटल्याचे म्हटले जात आहे. या भेटीवर रोहित पवार यांनी भाष्य केले. तटकरे यांना सिल्व्हर ओकचा चहा आवडत असावा. तटकरेंना त्यांच्या अध्यक्षांना काही मॅसेज द्यायचा असेल असे भाष्यही रोहित पवारांनी केले.

आमच्या पक्षाबाबत कोणीही भविष्यकाराने भविष्यवाणी करायची गरज नाही. आपल्या पक्षात काय चाललं आहे बघा. सुनेत्रा पवारांची साथ सोडणार नाही, आम्ही अजितदादांना मानणारे आहोत असे वक्तव्य आमदार अनिल पाटील यांनी रोहित पवार यांच्या विधानावर केले. मीडियात बातम्या पेरल्या जातायत, तटकरे, पटेल नाराज नाही. तटकरे, पटेल नाराज असतील तर त्यांनी बोलून दाखवावं. आसाम, गुवाहटीला सुनेत्रा वहिनींसोबत त्यांचा एकत्र पवार, नाराजीचं कारणच नाही. सुनेत्रा पवारांनी एक्स पोस्ट करुन सांगितलेले आहे. मुख्यमंत्रीही आमच्या आमदारांना व्यवस्थित न्याय देण्याचा प्रयत्न करतात. महायुतीचा आकडा 234 वरुन 240 वर पोहचला. त्यांच्याकडे जागा नसेल तर आम्ही त्यांच्या पक्षातल्या लोकांना आमच्याकडे घेऊ असा टोला लगावत रोहित पवारांचं भविष्य एकदिवस खोटं ठरेल, असा दावा अनिल पाटील यांनी केला.

--------------------------------

माध्यमांशी बोलताना फडणवीसांनी मोदींच्या आवाहनावर बोलताना हे भाष्य केलं.फडणवीस म्हणाले, "जेव्हा वैश्विक संकटाची वेळ आलेली असते तेव्हा जर आपल्या देशाचे पंतप्रधान काही उपाय सांगतात तर त्याला सकारात्मक पद्धतीनं घ्यायला हवं. आपण पाहतोय की सध्या जगातील अनेक देशांतील परिस्थिती खराब आहे. अनेक देशांमध्ये लॉकडाऊन झालं असून काही देशांमध्ये पेट्रोलचे भाव हे 400 ते 500 रुपयांवर पोहोचले आहेत. तीन-तीन दिवस पेट्रोल भेटत नाहीए, त्यामुळं या जागतीक संकटाच्या काळात देशाची अर्थव्यवस्था सुरळीत चालावी, देशासमोर संकट निर्माण होता कामा नये या दृष्टीनं जर काही उपाय पंतप्रधान सांगत असतील आणि विरोधक जर या उपायांची अंमलबजावणी करु शकत नसतील तर त्याची किमान याची थट्टामस्करी तरी करु नये.कारण प्रत्येक व्यक्तीची ही जबाबदारी आहे की आपापल्या पद्धतीने सर्वांनी या उपायांची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न सर्वांनी करावा. महाराष्ट्र सरकारनं देखील मंत्र्यांच्या सुरक्षा ताफ्यांचा विषय असेल किंवा परदेश दौऱ्यांचा विषय असतील किंवा विविध प्रकारांनी जिथं देशाचं परकीय चलन जिथं खर्च होतं त्यांचा कमीत कमी वापर कसा करता येईल प्रयत्न आहे. यासंदर्भात आम्ही एक बैठकही बोलावली आहे, निश्चित रुपात पंतप्रधानांनी जो संदेश देशवासियांना दिला आहे त्यादृष्टीने महाराष्ट्र देखील काम करेल.आपल्याकडं महागाई वाढू नये यासाठी पंतप्रधानांनी ज्या काही उपाययोजना सांगितल्या आहेत, त्यात प्रत्येकानं आपल्या जीवनशैलीत थोडासा जरी बदल केला तरी देखील आपण देशाला मदत करु शकू. सहा महिन्यांसाठी जर प्रधानमंत्र्यांनी जर देशवासियांना आवाहन केलं आहे तर मला विश्वास आहे की, भारतातील आपली जनता मदतच करेल. विरोधकांनी कितीही थट्टा केली तरी वैश्विक संकटात जर आपण देशाच्या पाठीशी उभे राहिलो नाहीतर ते योग्य होणार नाही. महाराष्ट्र आम्ही निर्णय केला आहे की मुख्यमंत्र्यांसह मंत्र्यांचे कॉन्व्हाय हे छोटे असतील. विदेश यात्रांवर आम्ही निर्बंध आणतो आहोत. ज्या ज्या गोष्टीत परकीय चलन खर्च होतं त्या त्या गोष्टींचा वापर कसा कमी होईल याचा आम्ही विचार करत आहोत. तसंच आपल्या स्वदेशी वस्तूंचा कसं प्रोत्साहन देता येईल याचाही आम्ही विचार करत आहोत, अशा पद्धतीनं पंतप्रधानांच्या आवाहनानंतर महाराष्ट्र शासन काय काय करत आहे याची सविस्तर माहिती यावेळी फडणवीसांनी दिली.

--------------------------------

धनंजय मुंडे यांनी टोकवाडी येथील त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन मुंडे कुटुंबीयांचेही सांत्वन केले. यावेळी अनेक जुन्या आठवणींना उजाळा दिला.

यावेळी परळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे, माजी पंचायत समिती सभापती पिंटू मुंडे, गणेश मुंडे यांसह आदी उपस्थित होते.

--------------------------------

आधारावर पदवीधर वेतनश्रेणी दिली जात होती. उर्वरित शिक्षकांकडे समान शैक्षणिक पात्रता, समान काम आणि समान जबाबदारी असूनही त्यांना या लाभापासून वंचित ठेवण्यात आले होते. यामुळे राज्यभरातील शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी होती.

--------------------------------

र प्रश्नावर बीडचे खासदार बजरंग सोनवणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सविस्तर पत्र लिहून जिल्ह्यासाठी विशेष निधीची मागणी केली असून, हा प्रश्न तातडीने मार्गी लावण्याची विनंती केली आहे.

पत्रात म्हटले आहे की, बीड जिल्ह्याची ओळख ही कष्टकरी आणि मजुरांची आहे. केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांच्या माध्यमातून हक्काचे पक्के घर मिळेल, या आशेने हजारो कुटुंबांनी घरकुलांच्या कामाला सुरुवात केली. मात्र, प्रशासकीय उदासीनता आणि निधीच्या कमतरतेमुळे आज जिल्ह्यातील जवळपास प्रत्येक गावात सरासरी 50 पेक्षा अधिक घरकुल प्रकरणे प्रलंबित आहेत. अनेक लाभार्थ्यांना पहिला हप्ता मिळाल्यानंतर घराचे पायाभरणी किंवा भिंतीचे काम पूर्ण झाले, मात्र त्यानंतरचा दुसरा हप्ता वेळेत न मिळाल्याने ही बांधकामे तिथेच थबकली आहेत. काही दुर्दैवी लाभार्थ्यांची निवड होऊनही त्यांना अद्याप पहिल्या हप्त्याची प्रतीक्षा आहे. खा. बजरंग सोनवणे यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या पत्रात लाभार्थ्यांच्या आर्थिक ओढाताणीवर बोट ठेवले आहे. घरकुलाचे काम अर्धवट राहू नये म्हणून ग्रामीण भागातील गरीब लाभार्थ्यांनी खासगी सावकारांकडून कर्ज काढून, नातेवाईकांकडून उसनवारी करून तसेच उधारीवर साहित्य आणून बांधकाम सुरु ठेवली. मात्र, शासनाकडून निधीच थांबल्याने त्यांच्यावर आता कर्जाचा डोंगर उभा राहत आहे. लाभार्थ्यांनी कर्ज काढून व उधारीवर साहित्य आणून बांधकाम सुरु केले; मात्र शासनाचा निधी वेळेत न मिळाल्याने त्यांच्यावर मोठे आर्थिक संकट निर्माण झाले आहे, असे खासदारांनी पत्रात नमूद केले आहे. या समस्येचे गांभीर्य लक्षात घेता, खासदार सोनवणे यांनी पत्राद्वारे तीन प्रमुख मागण्या मांडल्या आहेत. त्यामध्ये – बीड जिल्ह्यासाठी घरकुल हप्त्यांचा विशेष निधी तातडीने मंजूर करावा, ज्या लाभार्थ्यांचा पहिला व दुसरा हप्ता रखडलेला आहे त्यांना प्राधान्याने निधी वितरित करावा, जिल्हास्तरावर विशेष आढावा घेऊन प्रशासकीय यंत्रणेला गती देण्याचे निर्देश द्यावेत, या मागण्यांचा समावेश आहे. पावसाळा सुरु होण्यास आता काहीच दिवस शिल्लक असल्याने, तातडीने निधी उपलब्ध झाला नाही तर अर्धवट घरांचे मोठे नुकसान होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. जिल्ह्यातील गरीब नागरिकांचे घराचे स्वप्न धुळीस मिळू नये, यासाठी राज्य शासनाने या प्रकरणी तातडीने सकारात्मक निर्णय घेणे अपेक्षित आहे. खासदार सोनवणे यांनी या पत्राच्या प्रती ग्रामविकास मंत्री, ग्रामविकास विभागाचे प्रधान सचिव, बीडचे जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनाही पाठवल्या असून, प्रशासकीय पातळीवर या हालचालींना वेग मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

--------------------------------

या राहणार आहेत.

कार्यक्रमाला जिल्हा परिषद गटनेते अजय मुंडे, वैद्यनाथ बँकेचे चेअरमन विनोदशेठ सामत, माजी नगराध्यक्ष जुगलकिशोर लोहिया, वैद्यनाथ बँकेचे उपाध्यक्ष रमेशअप्पा कराड, माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक बाजीरावभैय्या धर्माधिकारी, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे जिल्हा प्रमुख सचिनभाऊ कागदे, परळी नगर परिषदेच्या उपाध्यक्षा खैसरबी राजा खान पठाण, बांधकाम सभापती प्रा. पवनकुमार मुंडे, स्वच्छता सभापती सौ. प्राजक्ताताई (भावड्या) कराड, पाणीपुरवठा सभापती सौ. जयश्रीताई रविंद्र गित्ते, महिला व बालविकास सभापती अंजलीताई माळी यांच्यासह परळी नगर परिषदेमधील अनेक नगरसेवक व मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक म्हणून ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. प्रकाशराव मराठे हे मार्गदर्शन करणार आहेत.

यंदाच्या शोभायात्रेचे प्रमुख आकर्षण म्हणजे पुण्यातील प्रसिद्ध पारंपारिक ढोल-ताशा पथक आणि सोलापूर जिल्ह्यातील माळशिरस येथील श्री शिवकालीन युद्धकला आखाड्याचा थरारक मर्दानी खेळ हे असणार आहेत. ढोल-ताशांचा दणदणाट, भगव्या पताका, शिवभक्तांचा उत्साह आणि शिवकालीन पराक्रमाचे दर्शन घडविणारे युद्धकौशल्य यामुळे संपूर्ण परळी शहर भगवेमय होणार असल्याचे चित्र आहे.

या भव्य शोभायात्रेस नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन करावे, असे आवाहन आयोजक नगरसेवक ॲड. प्रणव प्रकाश मराठे, नगरसेवक कार्तिक कांबळे, राजेश सोनवणे, ॲड. प्रदीप पिंगळ, नवीन मराठे, सचिन मराठे, गणेश देशमुख, कैलास तरकसे, अमित काळे, अभय बुद्धे, बालाजी कदम, स्वप्नील नाईकवाडे, अक्षय नाईकवाडे, राहुल पाचनकर, अमोल पवार, सोनू ताटे, अशोक पवार, संकेत कुरील, प्रथमेश वावदाने, मंगेश मस्के, राम मुंडे, किशोर बहादुरे, व्यंकटेश कराळे, प्रेम लोखंडे, आकाश सुत्रावे, विशाल माने, वैभव भोकरे, गणेश सिरसाट, निखील नावंदे, गणेश साखरे, ओम देशमुख, शिवा सातपुते, सोनू गांगर्डे तसेच धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज प्रतिष्ठाण, परळी वैजनाथ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

--------------------------------

जागेसंदर्भात तसेच राजमाता जिजामाता उद्यानातील बाल शिवबासह माँसाहेब जिजाऊंचा पुतळा बसवण्याच्या विषयी नगर पालिकेकडे अनेक दिवसांपासून पाठपुरावा केला जात असून सदरील मागणी जोपर्यंत मान्य केली जात नाही तोपर्यंत आंदोलन सुरूच राहणार असे आंदोलन कर्त्यांकडून सांगण्यात आले आहे.---------------------------------

पाठवण्यात आला आहे.

परळी ग्रामीण पोलीस याप्रकरणी अधिक तपास करत आहेत.

एका कर्तव्यदक्ष पोलीस कर्मचाऱ्याचा अशा आकस्मिक निधनाने पोलीस दलासह परिसरात मोठी हळहळ व्यक्त होत आहे.

--------------------------------

पाऊस बरसला. उन्हामुळे हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा मिळाला असून हवेत गारवा निर्माण झाला आहे.परभणी जिल्ह्यातील जिंतूर तालुक्यात इटोली, येलदरी यासह काही भागामध्ये, वादळी वाऱ्यासह रिमझिम पावसाने हजेरी लावली असून, अचानक झालेल्या या पावसामुळे, वाढलेल्या उकाड्यापासून नागरिकांना दिलासा मिळाला आहे. दुपारी तीन ते चार च्या दरम्यान, वादळ वारे सुरु झाले आणि त्यानंतर काही भागात रिमझिम पावसाने हजेरी लावली. तर जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये ढगाळ वातावरण असून, या भागात देखील पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.बीडच्या पाटोदा शहर व परिसराला सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास वादळी वाऱ्यासह पावसाने अक्षरशः झोडपून काढले. वादळी वाऱ्याचा वेग प्रचंड असल्याने परिसरातील अनेक घरावरील पत्रे उडाले आहेत. याबरोबरच अनेक ठिकाणी झाडे देखील उन्मळून पडली. तहसील कार्यालयाच्या आवारात विविध योजनांची माहिती देण्यासाठी उभारलेला जाहिरात फलक देखील या वादळी वाऱ्यामुळे कोसळला आहे. काही वेळ झालेल्या पावसामुळे उकाड्यापासून मात्र पाटोदाकरांची सुटका झाली.साताऱ्यात वादळी वाऱ्यासह विजांच्या कडकडाट अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. दुपारी अचानकच सातारा शहरासह भागात ढग दाटून आले आणि त्यानंतर मुसळधार पावसाला सुरुवात झाली. सोसाट्याच्या वाऱ्यामुळे अनेक ठिकाणी रस्त्यांवर झाडे कोसळल्याचे चित्र पाहायला मिळालं. वाढेफाटा चौकाचा ठिकाणी रस्त्यावर झाड कोसळल्याने काही वेळासाठी या ठिकाणची वाहतूक ठप्प झाली होती

रत्नागिरी जिल्ह्याच्या अनेक भागात अवकाळी पावसाच्या तुरळक सरी कोसळल्या. मे महिन्याच्या मध्यावर तापमान वाढीमुळे रत्नागिरीकर उकाड्याने हैराण झाले होते. कोकण किनारपट्टी भागातील हवेतील आद्रता 80 टक्क्यांवर गेल्याने तापमानात तीन ते चार अंशांची वाढ झाली आहे. पहाटे अवकाळी पाऊस झाल्यानंतर रत्नागिरी जिल्ह्यात सकाळपासून ढगाळ हवामान पहायला मिळाले.

## पान 4 वरुन

कपिलधारवाडी गावाचे पुर्नवसन आदी सार्वजनिक महत्वाच्या बाबींच्या अनुषंगाने तपशिलाने चर्चा झाली.

यावेळी संबंधित विभागाचे अधिकारी, कर्मचारी व बीड नगर परिषदेचे पदाधिकारी उपस्थित होते. नगराध्यक्ष प्रेमलताताई पारवे, उपनगराध्यक्ष विनोद मुळूक, नगराध्यक्ष प्रतिनिधी शेख मुजीब, सभापती शेख निजाम, गटनेते फारुक पटेल, नगरसेवक अशफाक इनामदार यांसह मान्यवरांनी उपस्थित राहून चर्चेत सहभाग घेतला.

यावेळी उपविभागीय अधिकारी कविता जाधव, उपजिल्हाधिकारी प्रभुदय मुळे, नगर परिषदेचे मुख्याधिकारी शैलेश फडसे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता तोंडे, बीड पाटबंधारे विभागाचे कार्यकारी अभियंता सुरेंद्र पवार एमआयडीसीचे क्षेत्र व्यवस्थापक अतुल पाथरे, जिल्हा रेशीम अधिकारी शंकर वराट, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता ऋषिकेश चिरके, बीड पाटबंधारे विभागाचे उपअभियंता विशाल हाते, महाराष्ट्र विभागाचे अभियंता राजेंद्र भोपळे, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे उपअभियंता आर्षद, नगर परिषदेचे अभियंता इफ्तेखार यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.बीड शहरासाठी सन 2017 मध्ये मंजूर झालेली अमृत पाणीपुरवठा योजना अद्याप नगर परिषदेकडे हस्तांतरित झाली नसल्या बाबत सविस्तर चर्चा झाली. योजनेतील जलकुंभ बंद असून वितरण व्यवस्था अपूर्ण असण्यासह इतर तांत्रिक बाबींवर चर्चा झाली. सन 2018 मध्ये 165 कोटी रुपये किंमतीची भुयारी गटार योजना अर्धवट असतानाही कंत्राटदारांनी कोट्यावधी रुपयांची उचल केली. या दोन्ही योजनेतील कंत्राटदारांनी काम न करता शेकडो कोटी रुपये उचल केल्याचे निष्पन्न झाले.या बाबत मंत्रालयीन स्तरावर कार्यवाही करून पाणी मलनिस्सारणाच्या संदर्भात नव्याने कार्यवाही करण्याचा निर्णय झाला. बीड शहरातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग 361 एफ चे काम विलंबाने होत असल्यामुळे नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे. पावसाळ्यापूर्वी महामार्ग आणि नाल्यांची कामे पूर्ण करण्याच्या सूचना केल्या.महामार्गाच्या अभियंत्यांकडून अडवणूकीची भूमिका घेतल्यामुळे बीड शहरातील पाण्याचा निचरा पावसाळ्यात होणार नाही, भविष्यातील या गंभीर अडचणींबाबत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी खंबीर भूमिका घेत कंत्राटदारावर वेळेत काम न झाल्यास गुन्हे दाखल करण्याची भूमिका घेत नगर पालिका आणि महामार्गाच्या अभियंत्यांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना दिल्या.

--------------------------------

सुव्यवस्था राखणे, गुन्हे प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे, संशयास्पद हालचालींची माहिती पोलीस प्रशासनाला तातडीने देणे, तसेच शासकीय योजनांच्या अंमलबजावणीत सहकार्य करणे या विषयांवर विशेष भर देण्यात आला. सामाजिक सलोखा, शांतता आणि गावातील सुरक्षित वातावरण टिकवून ठेवण्यासाठी पोलीस पाटील यांनी सक्रिय भूमिका बजवावी, असे आवाहनही करण्यात आले.ग्रामपातळीवरील कायदा-सुव्यवस्था मजबूत करण्यासाठी बीड पोलिसांचा पुढाकार दिसला.यावेळी आपत्ती व्यवस्थापन, निवडणूक कामकाजातील जबाबदाऱ्या, महिला व बालकांच्या सुरक्षेसंदर्भातील कर्तव्ये तसेच ग्रामस्थांमध्ये विश्वास निर्माण करण्यासाठी प्रभावी संवाद कसा साधावा याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.प्रसंगी बोलताना नवनीत कांवत यांनी पोलीस पाटील हे गावपातळीवरील पोलीस यंत्रणेचे महत्त्वाचे दुवा असल्याचे सांगत प्रामाणिकपणे व जबाबदारीने काम करण्याचे आवाहन केले. बीड जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी पोलीस प्रशासन आणि ग्रामपातळीवरील यंत्रणेमधील समन्वय अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.या उपक्रमामुळे बीड पोलिसांनी लोकाभिमुख आणि प्रभावी प्रशासनाची सकारात्मक सुरुवात केली असून, जिल्ह्यातील सुरक्षितता आणि सर्वांगीण विकासासाठी सर्व पोलीस पाटील एकत्रितपणे कार्य करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

--------------------------------

केले व त्यावर 29 कर्मचाऱ्यांनी एच आय व्ही तपासणी करुन घेतली आले तसेच किट्स साठा देखील पडताळणी करण्यात येऊन जनजागृतीपत्रक देण्यात आली.

--------------------------------

येणार आहे. खेळाडूंसाठी मागील पाच वर्षातील तर क्रीडा मार्गदर्शकांसाठी मागील दहा वर्षातील कामगिरीचा विचार केला जाणार आहे.

गुणवंत खेळाडू पुरस्कारासाठी अर्जदाराने संबंधित पुरस्कार वर्षासह मागील पाच वर्षांपैकी किमान दोन वर्षे जिल्ह्याचे अधिकृत स्पर्धांमध्ये प्रतिनिधित्व केलेले असणे आवश्यक आहे. राज्य, राष्ट्रीय, शालेय व केंद्र शासन आयोजित स्पर्धांमधील उत्कृष्ट कामगिरीचा विचार करण्यात येणार असून स्पर्धांची प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक राहणार आहे. अर्ज संबंधित अधिकृत जिल्हा संघटनेमार्फत सिफारस करुन सादर करणे आवश्यक असून अपवादात्मक परिस्थितीत वैयक्तिक अर्जही स्वीकारले जाणार आहेत.

तसेच एशियन गेम्स, कॉमनवेल्थ गेम्स, जागतिक अजिंक्यपद स्पर्धा, जागतिक चषक, युथ ऑलिंपिक, युथ कॉमनवेल्थ आदी आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभागी खेळाडूंना संबंधित पुरस्कार वर्षासाठी थेट जिल्हा क्रीडा पुरस्कार देण्याचा विचार करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

गुणवंत क्रीडा मार्गदर्शक पुरस्कारासाठी अर्जदाराने महाराष्ट्रात सलग दहा वर्षे क्रीडा मार्गदर्शनाचे कार्य केलेले असावे तसेच संबंधित पुरस्कार वर्षात त्यांचे वय 35 वर्षे पूर्ण असणे आवश्यक आहे. राज्य व राष्ट्रीय स्तरावरील पदकविजेते खेळाडू घडविणाऱ्या मार्गदर्शकांना अर्ज करता येणार आहे.अधिक माहितीसाठी श्री. अनिकेत काळे, क्रीडा अधिकारी, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड यांच्याशी 9604959678 या क्रमांकावर संपर्क साधावा.

विहित नमुन्यातील अर्ज जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे उपलब्ध असून पात्र खेळाडू व मार्गदर्शकांनी परिपूर्ण अर्ज 19 मे 2026 पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर यांच्यावतीने करण्यात आले आहे.

--------------------------------

करण्यात आला होता.नगर पंचायतीचे मुख्याधिकारी अजित ढोपे यांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवार आणि गुरुवार असे दोन दिवस केज शहर आणि अहमदपूर-अहिल्यानगर महामार्गावर कारवाई चालेल. त्यानंतर शुक्रवारी नेकनूर आणि परिसरातील महामार्गावरील अतिक्रमण काढले जाणार आहे.

--------------------------------

तिने मिळवलेल्या या यशाबद्दल भेल सेकंडरी स्कूलचे प्राचार्य,शिक्षक वृंद,आई, वडील, नातेवाईक आदींनी तिचे अभिनंदन केले आहे.

--------------------------------

बांधिलकी यांची दखल घेत महादेव इनकर यांची निवड करण्यात आली आहे.महादेव इनकर यांनी अनेक शासकीय कार्यक्रम, सत्कार समारंभ, जिल्हा परिषद ध्वजारोहण सोहळे, सामाजिक कार्यक्रम, महापुरुषांच्या जयंती उत्सव, विवाह समारंभ तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे प्रभावी सूत्रसंचालन केले आहे. त्यांच्या दमदार आवाजाची शैली, अचूक शब्दफेक आणि प्रभावी वक्तृत्व यामुळे त्यांनी श्रोत्यांची मने जिंकली आहेत.

बीड जिल्ह्यातील अनेक मान्यवर कार्यक्रमांमध्ये त्यांनी आपल्या निवेदनाची वेगळी छाप निर्माण केली असून, महागायक आनंद शिंदे यांच्या कार्यक्रमातही त्यांनी यशस्वी सूत्रसंचालन केले आहे. सामाजिक कार्यात सक्रिय सहभाग, लोकांशी जिव्हाळ्याचे संबंध आणि विनम्र स्वभाव यामुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व सर्वत्र आदराने पाहिले जाते.

त्यांच्या कार्याची दखल घेत यापूर्वीही बीड येथील शिक्षणाधिकारी यांच्या हस्ते त्यांचा गौरव करण्यात आला आहे.

रविवार, दि. 17 मे रोजी बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात आयोजित कार्यक्रमात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. जतीन रहमान साहेब तसेच विविध मान्यवरांच्या उपस्थितीत त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

महादेव इनकर यांच्या या यशाबद्दल विविध स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

--------------------------------

असलेल्या सुनिल मुंडे यांच्या निवडीमुळे वडवणीसह बीड व धारुर तालुक्यातील शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. विविध स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

पतसंस्थेच्या निवड प्रक्रियेदरम्यान सर्व संचालकांनी एकमुखाने विश्वास व्यक्त करत सुनिल मुंडे यांना अध्यक्षपदाची जबाबदारी दिली. या प्रसंगी संचालक प्रभाकर तिडके, शामराव मुळे, गोरक्षनाथ मुंडे, रोहिदास चव्हाण, बापू धनवे, भागवत घुले, महारुद्र बादाडे, विठ्ठल सानप, राजुदास राठोड, कृष्णा शिंदे, विजया सौदरमल, आशा घुगे आणि संगिता तिडके उपस्थित होते.

तसेच केंद्रप्रमुख सुरेश कराडे, पवनराजे देशमुख, प्रकाश गांडगे, सचिन कदम, बालाजी कोठुळे, सुरेश मुंडे, दत्तात्रय टिपरे, ज्ञानेश्वर वाव्हळ, हनुमंत मात्रे, ज्ञानेश्वर लंगे, युवा नेते गणेश मुंडे, सरपंच अशोक मुंडे, शाळा समितीचे अध्यक्ष संतोष घुले यांच्यासह मोठ्या संख्येने शिक्षक बांधव व स्नेहीजन उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांच्या हस्ते नवनिर्वाचित चेअरमन सुनिल मुंडे यांचा सत्कार करण्यात आला. "पतसंस्थेच्या माध्यमातून शिक्षकांच्या हिताचे निर्णय घेऊन संस्थेची प्रगती अधिक उंचावण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत," अशी ग्वाही सुनिल मुंडे यांनी यावेळी दिली. तसेच अविरोध निवड केल्याबद्दल त्यांनी सर्व संचालक मंडळ आणि सभासदांचे आभार मानले.

"सुनिल मुंडे सर यांच्या कामावरील विश्वास आणि सर्वसामान्य शिक्षकांशी असलेले आत्मीय नाते यामुळेच त्यांची निवड अविरोध झाली," अशी भावना अनेक सभासदांनी यावेळी व्यक्त केली.

--------------------------------

आरोपींना अटक केली असून त्यांच्या ताब्यातून दोन देशी बनावटीची पिस्तुले, चार जिवंत काडतुसे आणि धारदार शस्त्रे जप्त करण्यात आली आहेत. तपासादरम्यान समोर आलेल्या माहितीनुसार, आरोपी गेल्या फेब्रुवारी महिन्यापासून संजय भोकरे यांची रेकी करत होते. त्यामुळे हा कट पूर्वनियोजित असल्याचे स्पष्ट झाले आहे.

संजय भोकरे हे सांगली येथील अंबाबाई तालीम संस्थेचे अध्यक्ष तसेच दैनिक जनप्रवासचे समूह संपादक असून पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या वाढत्या प्रभावामुळे ते काही गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांच्या निशाण्यावर असल्याची चर्चा आहे.

विशेष म्हणजे, यापूर्वीही भोकरे कुटुंबाला लक्ष्य करण्यात आले होते. सुमारे वर्षभरापूर्वी सिद्धार्थ भोकरे यांच्या विरोधात पुण्यातून जीवे मारण्याचा कट रचण्यात आल्याची माहिती समोर आली होती. त्यावेळी धमकीचे पत्रही मिळाले होते. त्यामुळे या दोन्ही घटनांमध्ये काही संबंध आहे का, याची चौकशी करण्याची मागणी पत्रकार संघटनेने केली आहे.

दरम्यान, अलीकडील कारवाईनंतरही धोका कायम असल्याचे स्वतः संजय भोकरे यांनी स्पष्ट केले असून, 'प्लॅन बी' अंतर्गत पुन्हा हल्ला होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे प्रशासनाच्या सतर्कतेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

या पार्श्वभूमीवर पत्रकार संघटनेने आक्रमक भूमिका घेत मुख्यमंत्री व गृहमंत्री Devendra Fadnavis यांच्याकडे थेट मागणी केली आहे की, संजय भोकरे यांच्या जीवाला गंभीर धोका असल्याने त्यांना तातडीने झेड प्लस दर्जाचे पोलीस संरक्षण देण्यात यावे. तसेच, या कटामागील मुख्य सूत्रधाराचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कारवाई करावी.

यासंदर्भात तहसीलदार महेंद्रकर, पोलीस निरीक्षक वर्षा शिंदे आणि गायकवाड यांना निवेदन देण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे बीड जिल्हाध्यक्ष ॲड. विनायक जाधव, तालुकाध्यक्ष अशोकराव निपटे, उपाध्यक्ष शांतिनाथ जैन, डिजिटल मीडिया तालुकाध्यक्ष सतीशराव मुजमुले, संपादक ज्ञानेश्वर लंगे, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे तालुका अध्यक्ष प्रा. श्रीनिवास काकडे, अर्जुन मुंडे, शेख एजाज, शंकरराव झाडे, विष्णू डोईफोडे, नारायणराव जाधव, शंकरराव जाधव, अंकुश पवार, अंकुशराव गवळी यांच्यासह अनेक पत्रकार उपस्थित होते.

पत्रकारांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी जोर धरु लागली आहे.

--------------------------------

नाव उज्वल झाले आहे.

कु. हर्मिका जगतकर हिच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी सर्वत्र शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

--------------------------------

असून तिचे वडील आजारी असल्याने बेड रेस्टवर आहेत. अशा कठीण परिस्थितीतही तिने खचून न जाता शिक्षणाची कास धरली आणि अथक परिश्रमाच्या जोरावर हे यश मिळवले. घरातील अडचणी, आर्थिक संकट आणि मानसिक ताण यावर मात करत तिने मिळवलेले हे यश अनेक विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

वैष्णवीच्या यशामागे तिची चिकाटी, आई-वडिलांचे कष्ट आणि शिक्षकांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले. तिच्या या यशाबद्दल गावातून तसेच शाळा परिसरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

"परिस्थिती कितीही कठीण असली तरी मेहनत आणि आत्मविश्वास असेल तर यश मिळवता येते," हे वैष्णवीने आपल्या यशातून दाखवून दिले आहे.

--------------------------------

करण्यात आले आहे.

न्यायालयीन कोठडीनंतर आशिषची प्रकृती अचानक बिघडली. त्याला बीड जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र तेथेही योग्य उपचार न मिळाल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. डॉक्टर व पोलिस गार्डकडून अपमानास्पद वागणूक मिळाल्याचा दावा करण्यात आला आहे. अखेर दि. 28 एप्रिल रोजी उपचारादरम्यान आशिषचा मृत्यू झाला.

या संपूर्ण प्रकरणात संबंधित पोलिस कर्मचारी, कारागृह अधिकारी, डॉक्टर व कर्मचाऱ्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी कुटुंबीयांनी केली आहे. अन्यथा पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर किंवा जिल्हाधिकारी कार्यालय बीड येथे सहकुटुंब अमरण उपोषण छेडण्यात येईल, असा आक्रमक इशारा देण्यात आला आहे.

दरम्यान, या प्रकरणामुळे केज तालुक्यात मोठी खळबळ उडाली असून, नागरिकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे.

--------------------------------







# विकासकामांच्या पूर्ततेसाठी पाठपुरावा करणारच

## आ.विजयसिंह पंडित यांची ठाम भूमिका; रेशीम पार्क गेवराईत उभारणार




बीड : राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री स्व.अजितदादा यांच्या माध्यमातून बीडकरांनी विकासाचे आशादायी चित्र पाहिले होते. स्व. अजितदादांनी अनेक विकास कामांना मंजुरी देत नवे विकासाचे व्हिजन लोकांसमोर मांडले होते. त्यांच्या संकल्पनेतील विकास कामे उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांच्या माध्यमातून पूर्ण करून घेण्याची जबाबदारी माझी आहे.

राजकारणापेक्षा विकासकामे महत्वाची आहेत, त्यामुळे स्व.अजितदादांच्या संकल्पनेतील विकासकामे पूर्णत्वासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन आ. विजयसिंह पंडित यांनी केले. माजी आमदार अमरसिंह पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या अध्यक्षतेखाली गेवराई आणि बीडमधील विकास कामांचा आढावा घेतल्यानंतर ते बोलत होते.

आ. विजयसिंह पंडित यांनी सोमवार, दि.11 मे रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या उपस्थितीत गेवराई विधानसभा मतदार संघासह बीड शहरातील विकास कामांचा आढावा घेतला.

यावेळी रेशीम पार्क, गेवराई एमआयडीसी, आपत्ती सौम्यीकरणातील कामे, बीड एमआयडीसी, बीड शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गाच्या कामास होत असलेला विलंब, बीड शहरातील अमृत पाणीपुरवठा योजना, अर्धवट अवस्थेतील भुयारी गटार योजना, विज्ञान केंद्र व तारांगणाचे बांधकाम, यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाचे नुतणीकरण, क्रीडा संकुला विकास आराखडा, स्व.अजितदादा पवार यांचे स्मारक, मौजे पान 3 वर

# नवनियुक्त पोलीस पाटलांचे प्रशिक्षण सत्र व कार्यशाळा संपन्न.



बीड(प्रतिनिधी)बीड पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यातील नव्याने नियुक्त पोलीस पाटील यांचे मार्गदर्शन व प्रशिक्षण सत्र उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरित्या पार पडले. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून पोलीस पाटील यांच्या पदाची भूमिका, जबाबदाऱ्या, कर्तव्ये आणि कायदेशीर अधिकार याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

प्रशिक्षण सत्रात ग्रामपातळीवर कायदा व पान 3 वर

# प्राथमिक आरोग्य केंद्र मोहापासून मिशन एड्स सुरक्षा ला सुरुवात!



आज दिनांक 13/05/26 रोजी जिल्हाशल्यचकित्सक बीड आणि जिल्हा आरोग्य अधिकारी बीड यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार मिशन एड्स सुरक्षा अभियान अंतर्गत आयसीटीसी विभाग उपजिल्हा रुग्णालय परळी वैजनाथ येथील समुपदेशक श्री शरद चव्हाण व श्री अमोल गालफडे प्रयोगशाळा तंत्रज्ञ यांनी प्राथमिक आरोग्य केंद्र मोहा वैद्यकीय अधिकारी ,सी एच ओ एल एचवी ,ए एन एम,औषध निर्माता आशा वर्कर यांचे एच आय व्ही एड्स विषयी संवेदीकरण करण्यात आले यामध्ये 95-95-99 गोल साध्य करण्यासाठी रूपरेषा ठरवण्यात आली या कार्यक्रम प्रसंगी डॉ. महादेव मुंडे, डॉ. वैभव जगताप व सर्व कर्मचारी असे एकूण 51 जण उपस्थित होते तसेच गरोदर माता व जनरल रुग्ण यांचे एच आय व्ही गुप्तरोग कावीळ तपासणी करणेसाठी सांगण्यात तसेच कर्मचाऱ्यांना सुद्धा स्वतःची तपासणी करून स्वतः हा चे स्टेटस माहित करून घेण्याचे आवाहन पान 3 वर

# जिल्हा क्रीडा पुरस्कारासाठी अर्ज सादर करण्यास 19 मेपर्यंत मुदतवाढ



बीड | प्रतिनिधी क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, बीड यांच्या वतीने सन 2020-21, 2021-22 आणि 2022-23 या वर्षांकरिता देण्यात येणाऱ्या जिल्हा क्रीडा पुरस्कारांसाठी अर्ज सादर करण्याची मुदत आता 19 मे 2026 पर्यंत वाढविण्यात आली आहे. प्राप्त प्रस्तावांना अत्यल्प प्रतिसाद मिळाल्याने ही मुदतवाढ देण्यात आल्याची माहिती जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. अरविंद विद्यागर यांनी दिली.

जिल्ह्यातील गुणवंत खेळाडू व क्रीडा मार्गदर्शक यांच्या कार्याचा गौरव व्हावा तसेच त्यांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने शासनाच्या जिल्हा क्रीडा पुरस्कार नियम 2020 व 2022 नुसार हे पुरस्कार दिले जाणार आहेत. यामध्ये 01 गुणवंत क्रीडा मार्गदर्शक, 01 पुरुष खेळाडू, 01 महिला खेळाडू आणि 01 दिव्यांग खेळाडू अशा एकूण चार पुरस्कारांचा समावेश आहे.

सन 2020-21 पुरस्कारासाठी 1 जुलै 2020 ते 30 जून 2021, सन 2021-22 पुरस्कारासाठी 1 जुलै 2021 ते 30 जून 2022 आणि सन 2022-23 पुरस्कारासाठी 1 जुलै 2022 ते 30 जून 2023 हा कालावधी ग्राह्य धरण्यात पान 3 वर


## केज शहराने घेतला मोकळा श्वास!

# महामार्ग,शासकीय जागेवरील अतिक्रमणावर प्रशासनाचा 'हातोडा'



केज: शहरातील राष्ट्रीय महामार्ग आणि शासकीय जमिनीवर असलेल्या अतिक्रमणावर बुधवारी प्रशासनाने जोरदार कारवाई केली. प्रशासनाने दिलेल्या नोटिशीची मुदत संपल्यानंतर, बुधवारी सकाळी 9 ते दुपारी 2 वाजेपर्यंत ही मोहीम राबवण्यात आली. कारवाईची चाहूल लागताच, अनेक टपरीधारकांनी आपले नुकसान टाळण्यासाठी मध्यरात्रीच दुकाने आणि डबे काढून घेतले होते.या मोहिमेत तहसीलदार अशोक भंडारी, उपविभागीय अधिकारी शुभम पवार, पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्यासह सर्व विभागांचे प्रमुख अधिकारी सहभागी झाले होते. पोलीस अधीक्षक नवनीत कांवत यांच्या आदेशानुसार, दंगल नियंत्रण पथकाचे 2 प्लाटून आणि चार पोलीस ठाण्यांचा तगडा पोलीस बंदोबस्त तैनात पान 3 वर

# आकांक्षा सावंत 90 टक्के गुणांसह शालांत प्रमाणपत्र परिक्षेत मिळविले सुयश



परळी प्रतिनिधी. येथील भेल सेकंडरी स्कूलची विद्यार्थिनी आकांक्षा महिपाल सावंत हिने नुकत्याच जाहीर झालेल्या शालांत प्रमाणपत्र परीक्षेत 90 टक्के गुणांसह सुयश मिळविले आहे. तिने मिळवलेल्या या यशाबद्दल सर्वत्र तिचे अभिनंदन होत आहे.

मार्च 2026 मध्ये घेण्यात आलेल्या शालांत प्रमाणपत्र परिक्षेचा नुकताच निकाल जाहीर झाला आहे.या निकालात परळी येथील भेल सेकंडरी स्कूलची विद्यार्थिनी आकांक्षा महिपाल सावंत हिने 500 पैकी 450 गुण मिळवून घवघवीत यश संपादन केले आहे.शाळेतुन ती सातवी तर मुलींमध्ये चौथी आली आहे.सामाजिक कार्यकर्ते तथा राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक न्याय विभाग परळी तालुका अध्यक्ष दत्ताभाऊ सावंत यांची ती नात आहे. पान 3 वर

# निवेदक महादेव इनकर यांना राज्यस्तरीय "पद्मपाणी पुरस्कार" जाहीर



बीड | प्रतिनिधी

समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना दरवर्षी प्रदान करण्यात येणारा प्रतिष्ठेचा राज्यस्तरीय "पद्मपाणी पुरस्कार" यंदा बीडचे सुप्रसिद्ध निवेदक मा. महादेव जनार्धन इनकर यांना "उत्कृष्ट निवेदक" म्हणून जाहीर झाला आहे. त्यांच्या या निवडीमुळे बीड जिल्ह्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पत्रकारिता, शिक्षण, प्रशासन, सामाजिक कार्य, उद्योग, साहित्य अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार देण्यात येतो. यावर्षी उत्कृष्ट सूत्रसंचालन, प्रभावी आवाज आणि सामाजिक पान 3 वर

# शिक्षकांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देणार - चेअरमन सुनिल मुंडे

## वडवणी शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदी अविरोध निवड




वडवणी, दि.13 (प्रतिनिधी) : वडवणी शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षपदाची निवडणूक नुकतीच उत्साहात पार पडली. यामध्ये सर्व संचालक मंडळाने एकमुखाने चिंचवण केंद्राचे कर्तव्यदक्ष केंद्रप्रमुख सुनिल मुंडे सर यांची चेअरमनपदी अविरोध निवड केली. त्यांच्या निवडीची घोषणा होताच शिक्षक बांधव व स्नेहीजनांनी गुलालाची उधळण आणि फटाक्यांची आतिषबाजी करत जल्लोष साजरा केला.

शिक्षण क्षेत्रात कार्यतत्पर आणि शिक्षकांच्या प्रश्नांबाबत संवेदनशील नेतृत्व म्हणून ओळख पान 3 वर

# सांगलीत संपादक संजय भोकरे यांच्या हत्येचा कट उधळला; झेड प्लस सुरक्षेची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

## वडवणीत पत्रकार संघटनेच्या वतीने तहसीलदार व पोलीस निरीक्षकांना निवेदन




वडवणी | प्रतिनिधी

सांगली येथे पत्रकार नेते तथा महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य संघटक संजय भोकरे यांच्या हत्येचा कट पोलिसांनी उधळून लावल्याची धक्कादायक घटना समोर आली असून, या घटनेमुळे राज्यभरातील पत्रकारांमध्ये संताप आणि चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई शाखा बीड जिल्हा व वडवणी तालुका यांच्या वतीने वडवणी येथे तहसीलदार आणि पोलीस निरीक्षकांना लेखी निवेदन देऊन संजय भोकरे यांना तातडीने झेड प्लस दर्जाचे पोलीस संरक्षण देण्याची मागणी करण्यात आली.

पोलिसांनी या प्रकरणी तीन

# कु. हर्मिका जगतकर हिचे बारावी विज्ञान शाखेत घवघवीत यश; 76% गुणांसह उत्तीर्ण



बीड | प्रतिनिधी पत्रकार बालाजी जगतकर यांची कन्या कु. हर्मिका बालाजी जगतकर हिने इयत्ता बारावी विज्ञान शाखेच्या परीक्षेत 76 टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. बीड येथील श्री बंकट स्वामी विद्यालयाची विद्यार्थिनी असलेल्या हर्मिकाने आपल्या मेहनत, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या जोरावर हे यश मिळवले आहे.

विशेष म्हणजे, कोणत्याही खासगी ट्युशनचा आधार न घेता तिने नियमित अभ्यास आणि चिकाटीच्या बळावर हे यश संपादन केले. तिच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन आणि शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

भविष्यात मोठ्या पदावर कार्य करण्याचा मानस व्यक्त करत हर्मिकाने त्या दृष्टीने आतापासूनच अभ्यासाला सुरुवात केली असल्याचे सांगितले. तिच्या या यशामुळे कुटुंबासह विद्यालयाचेही पान 3 वर

# संघर्षावर मात करत वैष्णवी देवकतेचे घवघवीत यश

## वडील बेड रेस्टवर असतानाही दहावी परीक्षेत मिळवले 88.80 टक्के गुण



परळी / प्रतिनिधी-

जिद्द, मेहनत आणि संकटांशी दोन हात करण्याची तयारी असेल तर यश नक्की मिळते, याचे उत्तम उदाहरण म्हणजे वागबेट येथील कु. वैष्णवी अरुण देवकते हिचे यश होय. साईनाथ माध्यमिक विद्यालय, वागबेट ता. परळी वैजनाथ जि. बीड येथील विद्यार्थिनी असलेल्या वैष्णवीने दहावी बोर्ड परीक्षेत 88.80 टक्के गुण मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

वैष्णवीच्या घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची पान 3 वर

# पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्याकडे धाव

## "आशिष धिवार मृत्यूप्रकरण दाबण्याचा प्रयत्न करू नका"; कुटुंबीयांचा संताप




**पोलिस, कारागृह व रुग्णालय प्रशासनावर गंभीर आरोप; दोषींवर कारवाई न झाल्यास अमरण उपोषणाचा इशारा**

केज | प्रतिनिधी केज तालुक्यातील काळेगाव (घाट) येथील युवक आशिष ऊर्फ बंटी आशोक धिवार यांच्या संशयास्पद मृत्यूप्रकरणी वातावरण चांगलेच तापले असून, मृताच्या कुटुंबीयांनी थेट पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्याकडे धाव घेत न्यायाची मागणी केली आहे. पोलिस कर्मचारी, कारागृह प्रशासन तसेच जिल्हा रुग्णालयातील डॉक्टर व कर्मचाऱ्यांवर अमानुष वागणूक, मारहाण आणि निष्काळजीपणाचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत.

मृत आशिषचा भाऊ अभिषेक धिवार यांनी दिलेल्या निवेदनात धक्कादायक आरोप करत म्हटले आहे की, दि. 23 एप्रिल रोजी केज पोलिसांनी आशिषला अटक करताना घरातून फरफटत बाहेर काढले व कुटुंबीयांसमोर बेदम मारहाण केली. "पोलिसी खाक्या दाखवतो" अशी धमकी देत मानसिक व शारीरिक छळ करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

याचबरोबर तपासी अधिकाऱ्यांनी एक लाख रुपयांची मागणी केल्याचा गंभीर आरोप कुटुंबीयांनी केला आहे. पैसे न दिल्यास "हाल करु" अशी धमकी देण्यात आल्याचे निवेदनात नमूद पान 3 वर

